**सुट्टीची सूचना**

मंगळवार, दि.०३ मार्च २०२६ रोजी धुलीवंदन असल्यामुळे दैनिक वादळ वार्ता कार्यालयास सुटी राहील. त्यामुळे दि.०४ रोजीचा अंक प्रकाशीत होणार नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी..

– व्यवस्थापक

दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com संपादक : अजय भांगे https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी • मंगळवार दि.३ मार्च २०२६ • 9422660077 • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष ३ रे • अंक १८७ • पाने ४ • किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi • Tuesday 3 March 2026 • 9422660077 • RNI-MAHMAR / 2023 / 87555 • Year - 3rd • Issue 187 • Pages 4 • Rate 4 Rs





# आ.सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रयत्नांमुळे कापूस खरेदीला १५ मार्चपर्यंत मुदतवाढ

## शेतकऱ्यांच्या हितासाठी आ.सुधीर मुनगंटीवार यांचा यशस्वी पाठपुरावा

### अतिवृष्टीमुळे अडचणीत सापडलेल्या कापूस उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा

### आ.मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री व केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्र्यांकडे केलेल्या पाठपुराव्याला यश



दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांच्या अडचणींप्रती कायम संवेदनशील भूमिका घेणारे राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार श्री. सुधीर मुनगंटीवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे कापूस उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. आ. मुनगंटीवार यांच्या प्रयत्नांमुळे कापूस खरेदीसाठीची अंतिम मुदत २७ फेब्रुवारीवरून १५ मार्च २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. अतिवृष्टीमुळे कापूस काढणीस उशीर झाल्याने एमएसपीचा लाभ घेण्यापासून वंचित राहण्याची भीती असलेल्या शेतकऱ्यांना या निर्णयामुळे मोठा दिलासा मिळाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस तसेच केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री ना.गिरिराजजी सिंह यांच्याकडे पत्र व दूरध्वनीद्वारे केलेल्या प्रभावी पाठपुराव्यामुळे हा निर्णय शक्य झाला असून, याबद्दल आ. मुनगंटीवार यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि केंद्रीय मंत्री गिरिराज सिंह यांचे आभार मानले आहे. आ. सुधीर मुनगंटीवार यांनी यापूर्वीच कापूस खरेदीची अंतिम मुदत वाढविण्याची मागणी मुख्यमंत्री तसेच भारतीय कपास निगम (सीसीआय) मुंबईचे चेअरमन श्री. ललितकुमार गुप्ता यांच्याकडे केली होती. राज्यातील विविध भागांत झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतजमिनीत ओलावा कायम राहिल्याने कापूस वेचणी व काढणीला मोठा विलंब झाला आहे. चंद्रपूर जिल्ह्यासह विदर्भातील अनेक भागांत शेतकऱ्यांच्या घरी अद्याप कापूस पोहोचलेला नसल्याने एमएसपी अंतर्गत विक्री करण्यास अडचणी निर्माण झाल्या आहेत. यासंदर्भात आ. मुनगंटीवार यांनी आग्रही मागणी केली होती.या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी आ. मुनगंटीवार यांना निवेदन सादर करून समस्या मांडल्या होत्या. त्या निवेदनाची तातडीने दखल घेत आ. मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना पत्र पाठवत तसेच केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरिराजजी सिंह यांच्याशी



दूरध्वनीद्वारे संपर्क साधत मुदतवाढीची मागणी लावून धरली. त्यांच्या या पाठपुराव्यामुळे अखेर कापूस खरेदीसाठी १५ मार्चपर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला.तसेच, सीसीआयमार्फत सुरू असलेल्या खरेदी प्रक्रियेत एकही शेतकरी वंचित राहू नये यासाठी संबंधित यंत्रणांना आवश्यक त्या सूचना देण्याची मागणीही आ. मुनगंटीवार यांनी केली आहे. वाढीव मुदतीच्या कालावधीत जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी नोंदणी करून एमएसपीचा लाभ घ्यावा, असे आवाहनही आ. मुनगंटीवार यांनी केले आहे. राज्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा ठरणार असून, आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या संवेदनशील व प्रभावी नेतृत्वामुळे हजारो शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

# पत्रकार महादेव गायकवाड पत्रकारिता संघर्ष गौरव पुरस्काराने सन्मानित

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

दै.रणझुंजारचे केज तालुका प्रतिनिधी महादेव गायकवाड हे पत्रकारिता संघर्ष गौरव पुरस्काराने व इतर मान्यवरही रविवारी सन्मानित झाले.केज शहरातील शिक्षकांची सहकारी पतसंस्था येथे एक मार्च रविवारी सायंकाळी सन्मानित करण्यात आले.यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ,मुंबई,राष्ट्रीय पत्रकार संघ केज,पुरोगामी पत्रकार संघ,सह्याद्री पत्रकार संघाचे सर्व पत्रकार व आयोजक पत्रकार चंद्रकांत पाटील, संपादक अजय भांगे, रंजीत घाडगे,अनील ठोंबरे यांच्यासह पत्रकार बांधवांनी परिश्रम घेऊन हा कार्यक्रम यशस्वी केला.केज शहरातील शिक्षकांची सहकारी पतसंस्था येथे १ मार्च रविवारी संध्याकाळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ,मुंबई,राष्ट्रीय पत्रकार संघ केज,पुरोगामी पत्रकार संघ तसेच सह्याद्री पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने विविध क्षेत्रांतील



कर्तृत्ववान व्यक्ती व महीलांच्या कामाची दखल घेऊन त्यांचा गुण गौरव पुरस्कार जाहीर
केले होते.यामध्ये केज नगर पंचायतच्या उत्कृष्ट नगराध्यक्षा डॉ.सौ. सिताताई बनसोड यांना पुरस्काराने सन्मानित केले तर केज भूषण गौरव पुरस्कार डॉ.हारुणभाई इनामदार, आदर्श डॉक्टर गौरव पुरस्कार डॉ.बालासाहेब अस्वले,अष्टपैलू समाज गौरव पुरस्कार हनुमंत भोसले सर,उत्कृष्ट नगरसेवक गौरवपुरस्कार राजुभाई इनामदार, पत्रकारिता जीवन गौरव पुरस्कार श्री.धनंजय कुलकर्णी,उत्कृष्ट पत्रकारिता गौरवपुरस्कार संतोष गालफाडे, पत्रकारिता संघर्ष गौरव पुरस्कार महादेव गायकवाड,निर्भीड पत्रकारिता गौरवपुरस्कार गौतम बचुटे,पँथर भूषण गौरव पुरस्कार दिपक कांबळे,क्रीडा प्रशिक्षक गौरव पुरस्कार विनोद गुंड,उत्कृष्ट अभिनेता गौरव पुरस्कार प्रजेनजिन राहुल गायकवाड,उत्कृष्ट अधिपदीचारीका गौरव पुरस्कार ज्योती विलास मस्के-आरकडे,आदर्श शिक्षक गौरव पुरस्कार प्रा.धनराज भालेराव, उत्कृष्ट सामाजिक कार्य गौरव पुरस्कार अरविंद थोरात,उत्कृष्ट युवा उद्योजक गौरव पुरस्कार महेश तपसे तसेच समाजसेवक गौरव पुरस्कार वृद्धाश्रमचे महादेव कराड यांना देऊन सन्मानित करण्यात आले.या कार्यक्रमाचे प्रस्ताविक संपादक अजय भांगे यांनी केले तर महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ,मुंबई, राष्ट्रीय पत्रकार संघ केज,पुरोगामी पत्रकार संघ तसेच सह्याद्री पत्रकार व सर्व संघाच्या पत्रकार बांधवांनी पुरस्कार विजेत्यांना फेटा बांधून एक झाड व ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले.शेवटी या सांस्कृतीक कार्यक्रमात केज तालुक्यातील अनेक प्राथमीक व माध्यमिक गटाच्या मुलामुलीनी सहभागी होऊन आपली कला दाखवून उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली या कार्यक्रमासाठी परिक्षक म्हणून डॉ.हनुंमत सौदागर प्रा.पवन सरवदे,प्रा. विठ्ठल समुद्रे यांनी परिक्षण करुन निकाल जाहीर केला.या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन हनुमंत भोसले सर यांनी केले.या कार्यक्रमासाठी पत्रकार बांधव,नागरीक व महिला व विद्यार्थी मोठ्या संख्येंने उपस्थित होते.

# श्रीक्षेत्र पावनधाम संस्थानात भक्तिरसाची उधळण ; संत तुकाराम महाराज बीजनिमित्त सप्ताहात अकराव्या वंशजांचे कीर्तन

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

श्री क्षेत्र संत तुकोबाराय पावनधाम संस्थान येथे जगद्गुरु संत तुकाराम महाराज बीजनिमित्त आयोजित सप्ताहाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. ह.भ.प.महंत महादेव महाराज बोराडे शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली दररोज विविध महाराजांची कीर्तने, अभंग गायन व प्रवचने भक्तिभावाने पार पडत आहेत.सप्ताहातील कीर्तनमालेतील चौथेपुष्प म्हणून संत तुकाराम महाराजांचे अकरावे वंशज ह.भ.प.पुंडलिक महाराज देहुकर यांचे ओजस्वी कीर्तन संपन्न झाले.यावेळी बोलताना ते म्हणाले की,श्री क्षेत्र संत तुकोबाराय पावनधाम संस्थान हे देहूकरांचे माहेरघर आहे. संत तुकाराम महाराजांच्या नामाचा गजर अखंड सुरू राहणे हीच खरी सेवा आहे.

ते पुढे म्हणाले की,संत तुकाराम महाराजांच्या अभंगातून समाजाला भक्ती,सदाचार आणि समतेचा संदेश मिळतो. ही परंपरा जपणे आणि पुढील पिढ्यांपर्यंत पोहोंचविणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.संत तुकोबाराय पावनधाम



संस्थान हे कार्य अत्यंत निष्ठेने करत आहे,हे अत्यंत अभिमानास्पद आहे.या कीर्तनामुळे पावनधाम परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले असून भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहिले. सप्ताह सोहळा भाविकां साठी आध्यात्मिक उर्जेचा अनमोल ठेवा ठरत आहे.

# पत्रकार संघाचा उत्कृष्ट सेवेला मानाचा मुजरा ज्योती विलासराव आरकडे-मस्के यांना 'उत्कृष्ट अधिपरिचारिका' पुरस्कार प्रदान

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई,शाखा केज, राष्ट्रीय पत्रकार संघ, पुरोगामी पत्रकार संघ व सह्याद्री पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने अधिपरिचारिका ज्योती विलासराव आरकडे -मस्के यांना उत्कृष्ट अधिपरिचारिका पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.आरोग्य क्षेत्रात अनेक वर्षे निष्ठा, समर्पण आणि सेवा भावाने केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला.

ज्योती आरकडे-मस्के यांनी उपजिल्हा रुग्णालय केज,ग्रामीण रुग्णालय धारूर,ग्रामीण रुग्णालय भोकर जि. नांदेड तसेच जिल्हा रुग्णालय बीड येथील मोबाईल टीममध्ये महत्त्वपूर्ण सेवा बजावली आहे.शस्त्रक्रिया गृहात कार्य करताना त्यांनी जिल्हा शल्यचिकित्सक यांच्या मोबाईल टीम सोबत जिल्ह्यातील विविध प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय व उपजिल्हा रुग्णालयां मध्ये आयोजित शस्त्रक्रियांमध्ये सक्रिय सहभाग घेतला.सध्या त्या स्त्री रुग्णालय, लोखंडीसावरगाव येथे अधिपरिचारिका म्हणून कार्यरत असून आता पर्यंत १० हजारांहून अधिक शस्त्रक्रियांमध्ये असिस्टंट म्हणून काम केले आहे.यामध्ये गर्भ शस्त्रक्रिया,हर्निया, अपेंडिक्स,गर्भ पिशवी शस्त्रक्रिया,बाळंतपण तसेच कुटुंब नियोजन शस्त्रक्रियांचा समावेश आहे.याशिवाय जवळ पास ५ हजार मोतीबिंदू शस्त्रक्रियांमध्ये त्यांनी सहाय्यक म्हणून योगदान दिले आहे.केज तालुक्यातील विविध प्राथमिक आरोग्य केंद्रां सह आडस,बनसारोळा, अंबाजोगाई येथील धानोरा ग्रामीण रुग्णालय तसेच धाराशिव जिल्ह्यातील वाशी ग्रामीण रुग्णालय येथे जाऊन कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया मोहिमांमध्ये त्यांनी उल्लेखनीय सहभाग नोंदवला. आरोग्य सेवेत रुग्णांप्रती असलेली बांधिलकी, कर्तव्यनिष्ठा आणि सातत्यपूर्ण सेवा या मुळेच त्यांना हा सन्मान मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. त्यांच्या कार्यामुळे ग्रामीण भागातील हजारो रुग्णांना वेळेत उपचार व शस्त्रक्रियेचा लाभ मिळाला आहे.हा पुरस्कार प्रदान करताना पत्रकार संघाला आनंद होत आहे असे त्यांनी सांगितले आहे.



# संपादकीय

## शुद्ध हवेचा हक्क

नेदरलँडमधील हेगस्थित आंतरराष्ट्रीय न्यायालयाने ( ICJ ) २३ जुलैला हवामान बदलासंदर्भात राष्ट्रांच्या जबाबदाऱ्यांबाबत एक ऐतिहासिक मत नोंदवले आहे. संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने मागितलेल्या मताबद्दल निकाल देत न्यायालयाने स्पष्टपणे सांगितले की पृथ्वीच्या हवामान प्रणालीचे संरक्षण करणे ही सर्व देशांची कायदेशीर जबाबदारी आहे. महासभेने न्यायालयाला दोन मूलभूत प्रश्न विचारले होते: पहिला, हरितगृह वायूंच्या मानवनिर्मित उत्सर्जनापासून हवामान प्रणाली आणि पर्यावरणाच्या इतर बाबींचे संरक्षण सुनिश्चित करण्यासाठी आंतरराष्ट्रीय कायद्यांतर्गत देशांच्या जबाबदाऱ्या काय आहेत? आणि दुसरा, या जबाबदाऱ्यांचे उल्लंघन केल्यास कायदेशीर परिणाम काय असतील? या निर्णयात न्यायालयाने अनेक महत्त्वाचे मुद्दे मांडले. प्रथम, पॅरिस करारातील सहभागी देशांनी जागतिक तापमानवाढ १.५ अंश सेल्सिअसपर्यंत मर्यादित ठेवण्यासाठी योग्य उपाययोजना करणे बंधनकारक आहे. दुसरे, प्रत्येक देशाने आपल्या राष्ट्रीय स्तरावर निश्चित केलेल्या योगदानाची (छऊछ) पूर्तता करणे आवश्यक आहे. न्यायालयाने हे देखील स्पष्ट केले की, हरितगृह वायूंच्या उत्सर्जनामुळे हवामान प्रणालीला होणाऱ्या हानीसाठी देश जबाबदार धरले जाऊ शकतात. जीवाश्म इंधनाचे उत्पादन, वापर, व त्याच्या उत्खननासाठी परवाने देणे किंवा अनुदान देणे यांसारख्या कृतींमुळे हवामान बदल रोखण्यात अपयश आल्यास ते आता आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन ठरू शकते. विशेष म्हणजे, न्यायालयाच्या इतिहासात केवळ पाचव्यांदाच सर्व न्यायाधीशांनी एकमताने निर्णय दिला आहे. या प्रक्रियेत तब्बल ९६ देश आणि ११ आंतरराष्ट्रीय संस्थांनी भाग घेतला, हा न्यायालयाच्या इतिहासातील सर्वाधिक सहभाग आहे.

न्यायालयाच्या निकालात श्रीमंत विकसित राष्ट्रांच्या जबाबदाऱ्यांवर विशेष भर देण्यात आला आहे. णछऋउउ च्या परिशिष्ट १ मध्ये नमूद केलेल्या देशांवर हवामान बदलाविरुद्धच्या लढ्यात पुढाकार घेण्याची अतिरिक्त जबाबदारी आहे. विकसित देशांच्या यादीमध्ये अमेरिका, ब्रिटन, कॅनडा, जर्मनी, ऑस्ट्रेलिया आणि इतर विकसित राष्ट्रांचा समावेश आहे, न्यायालयाने स्पष्टपणे नमूद केले की या राष्ट्रांनी केवळ आपले हरितगृह वायू उत्सर्जन मर्यादित करणेच नव्हे तर हरितगृह वायू शोषक आणि संचयकांमध्ये वाढ करणे देखील आवश्यक आहे. महत्त्वाचे म्हणजे, न्यायालयाने या श्रीमंत राष्ट्रांवर आर्थिक सहाय्य, तंत्रज्ञान हस्तांतरण आणि क्षमता निर्माण याच्या माध्यमातून विकसनशील देशांना मदत करण्याची बंधनकारक जबाबदारीही निश्चित केली आहे. ही सर्व सहकार्ये 'सद्भावनेने' करणे अनिवार्य आहे. केवळ कागदोपत्री आश्वासने न देता आता प्रत्यक्ष कृती करणे आवश्यक आहे. त्याच प्रमाणे ही मदत कर्जाच्या रूपात देण्याची जी प्रथा श्रीमंत देशांकडून चालू होती, त्यावरही आळा बसेल अशी आशा आहे.

**बेट राष्ट्रे आणि विकसनशील देशांसाठी महत्त्व**

बेट राष्ट्रे आणि विकसनशील देशांसाठी हा निकाल विशेष महत्त्वाचा आहे. भौगोलिक परिस्थिती आणि विकासाच्या पातळीमुळे जे देश हवामान बदलाच्या दुष्परिणामांना अधिक बळी पडतात किंवा विशेषतः असुरक्षित आहेत, त्यांना इतर देशांप्रमाणेच कायदेशीर उपाय उपलब्ध असल्याचं न्यायालयाने अधोरेखित केलं.

पॅसिफिक महासागरातील वानुआतु, तुवालू, किरिबाती यांसारख्या छोट्या बेट राष्ट्रांसाठी हा निकाल अक्षरशः जीवन-मरणाचा प्रश्न आहे. समुद्राच्या वाढत्या पातळीमुळे या देशांचे अस्तित्वच धोक्यात आले आहे. न्यायालयाच्या या निर्णयामुळे आता या राष्ट्रांना श्रीमंत औद्योगिक देशांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यासाठी आवश्यक ठोस आधार मिळाला आहे. विशेष म्हणजे, न्यायालयाने मान्य केले की या देशांनी हवामान बदलात नगण्य योगदान दिले असूनही त्यांना सर्वाधिक फटका बसत आहे. बांगलादेश, मालदीव, फिलिपाइन्स यांसारख्या विकसनशील देशांसाठी देखील हा निकाल आशेचा किरण आहे. त्यांना आता नुकसान भरपाई, आर्थिक मदत आणि तंत्रज्ञान हस्तांतरणासाठी कायदेशीर मार्ग उपलब्ध झाला आहे. महत्त्वाचे म्हणजे, न्यायालयाने स्पष्ट केले की 'विशेषतः प्रभावित' किंवा 'विशेषतः असुरक्षित' राष्ट्रांना इतर देशांप्रमाणेच समान उपाय मिळण्याचा हक्क आहे.

**खासगी कंपन्यांवरील नियंत्रणाची आवश्यकता**

न्यायालयाच्या निकालातील एक अत्यंत महत्त्वाचा भाग म्हणजे खासगी क्षेत्रावरील राष्ट्रांच्या जबाबदारीचे स्पष्टीकरण. न्यायालयाने ठामपणे सांगितले की प्रत्येक देशाने आपल्या अधिकार क्षेत्रातील खासगी कंपन्यांच्या उत्सर्जनावर प्रभावी नियंत्रण ठेवणे कायदेशीरदृष्ट्या बंधनकारक आहे. याचा अर्थ असा की, आता राष्ट्रे केवळ 'कंपन्या स्वतंत्र आहेत,' असे म्हणून आपली जबाबदारी टाळू शकत नाहीत. उदाहरणार्थ, जर एखाद्या देशातील तेल कंपनी, कोळसा खाण किंवा सिमेंट कारखाना मोठ्या प्रमाणात कार्बन उत्सर्जन करत असेल, तर योग्य कायदे, नियम आणि मर्यादा लागू करून हे उत्सर्जन नियंत्रित करणं ही त्या देशाची जबाबदारी असेल. न्यायालयाने स्पष्ट केले की योग्य नियंत्रक उपाययोजना न केल्यास हे राष्ट्राच्या 'योग्य काळजी' ( वींश वळश्रळसशपलश ) घेण्याच्या कर्तव्यात अपयश मानले जाईल आणि त्यासाठी संबंधित राष्ट्र आंतरराष्ट्रीय स्तरावर जबाबदार धरले जाईल. या निर्णयामुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांना नियंत्रित करण्यासाठी देशांवर अधिक दबाव येणार आहे आणि 'कॉर्पोरेट क्लायमेट रिस्पॉन्सिबिलिटी' ही संकल्पना अधिक बळकट होणार आहे.

**भारतासाठी या निकालाचे महत्त्व**

भारतासाठी हा निकाल अनेक दृष्टीने महत्त्वाचा आहे. जगातील तिसरा सर्वाधिक कार्बन उत्सर्जक देश असूनही, भारताचे दरडोई उत्सर्जन विकसित देशांच्या तुलनेत अत्यंत कमी आहे. न्यायालयाने 'समान पण भिन्न जबाबदाऱ्या आणि संबंधित क्षमता' या तत्त्वाला दिलेल्या महत्त्वामुळे भारताल विकासात्मक गरजा आणि हवामान कृती यांचा समतोल साधण्यास मदत मिळेल. विशेष म्हणजे, भारताला आता विकसित देशांकडून हवामान वित्त, स्वच्छ तंत्रज्ञान हस्तांतरण आणि क्षमता निर्माण यासाठी अधिक ठामपणे मागणी करता येईल. गेल्या वर्षी कॉन्फरन्स ऑफ पार्टिस परिषदेत विकसित देश स्वतःची हवामान बदलासंदर्भात नुकसानभरपाई देण्याच्या जबाबदारीकडे लक्ष न देता भारतासारख्या विकसनशील देशांकडे बोट दाखवत त्यांनीही गरीब राष्ट्रांना पैसे पुरवावेत, अशी मागणी करत होते. परंतु, आता या निकालातून ऐतिहासिक उत्सर्जन आणि दरडोई उत्सर्जन विचारात घेत देशांवरील जबाबदारी स्पष्ट करण्यात मदत होईल. दुसरीकडे, भारतात वाढत चाललेली कोळसा आधारित वीजनिर्मिती, वाढते औद्योगिक उत्सर्जन आणि खासगी क्षेत्रातील मोठ्या कंपन्यांच्या उत्सर्जनावरील नियंत्रण या बाबतीत भारतावरही दबाव वाढणार आहे.हिमालयातील हिमनद्या वितळणे, मान्सूनचे बदलते स्वरूप व त्यातून वारंवार येणारे पूर आणि दुष्काळ यांसारख्या समस्या त्यामुळे होणाऱ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि जमिनीचे नुकसान, किनारपट्टीवरील शहरांना समुद्र पातळी वाढीचा धोका या गंभीर समस्यांना तोंड देत असलेल्या भारतासाठी हा निकाल श्रीमंत देशांकडून नुकसान भरपाई मिळविण्यासाठी नवीन मार्ग उघडतो. तसेच भारताने २०७०पर्यंत नेट झिरो उत्सर्जनाचे लक्ष्य ठेवले आहे, परंतु या निकालानंतर हे लक्ष्य अधिक महत्त्वाकांक्षी बनविण्यासाठी आंतरराष्ट्रीय दबाव वाढू शकतोया निर्णयाचे दूरगामी परिणाम होण्याची शक्यता आहे. आता कोणताही देश हवामान बदलाच्या जबाबदारीतून सुटू शकणार नाही. हवामान न्यायासाठी झगडणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी आणि भावी पिढ्यांसाठी हा निकाल एक महत्त्वाचा विजय मानला जात आहे.

# होलिकोत्सवाला सुरुवात : धडगावला भरला पारंपरिक भोंग-या बाजार चैतन्य

## सातपुड्यात घुमू लागले ढोल-बिरीचे सूर

**मोलगी । (रविंद्र वळवी)**

१८६७ पासुन परंपरा असलेल्या धडगाव शहारात सोमवारी आठवडे बाजारानिर्मित्त भोंग-या बाजार भरवण्यात आला होता. बाजारासाठी दुर्गम भागातून हजारो आदिवासी बांधवांनी हजेरी लावत सांस्कृतिक पथसंचलनात सहभागी होऊन आदिवासी लोकसंस्कृतीचे दर्शन घडवले. पोलीस पाटील भिमसिंग पराडके यांच्या घरापासून सुरु झालेल्या सांस्कृतिक शोभायात्रेचा दुपारी समारोप करण्यात आला .ढोल, मांदल,ढोलकी,पेपा-या, तुतळ्या आणि बासुरीच्या सुरांमुळे धडगाव परिसरात चैतन्य निर्माण झाले होते. विविध वाद्यातील घेरनृत्य करत रंगत आणली होती. भोंगा-या बाजारातून दिवसभरात पूजा साहित्य तसेच विविध वस्तूंची खरेदी करण्यात आली.



**थाटात निघाली शोभायात्रा**

पोलीस पाटील भिमसिंग पराडके यांच्या घरापासून सकाळी ११.वाजेपासून मानाच्या भोंग-या मिरवणुकील प्रारंभ करण्यात आला. पराडके कुटुंबातील पाचव्या पिढीचे पोलीस पाटील प्रतिनिधी असलेले भिमसिंग पराडके यांचे खापर पणजोबा मोल्या पराडके यांनी १८६७ मध्ये पहिल्यांदा धडगावात भोंग-या बाजार भरवल्याची माहिती आहे. त्यांच्या नंतर साठ्या पराडके, परबा पराडके, भामटा पराडके यांनी ही परंपरा ठेवली होती. पराडके कुटुंबाचा हा वारसा पोलीस पाटील भिमसिंग पराडके हे ३२.वर्षा पासून अधिक काळापासून चालवत आहेत. सोमवारी त्याच्या घरी आदिवासींच्या विविध पारंपरिक ठेवणीच्या शस्त्रांचे पूजन करण्यात येऊन प्रसादाचे वाटप करण्यात आले. यानंतर शोभायात्रेला प्रारंभ करण्यात आला होता. यात शेकडोंच्या संख्येने आदिवासी बाधंव सहभागी झाले.

**शहरातील विविध मार्गांवर उत्साह**

भोंग-या बाजाराचे मानकरी पोलीस पाटील भिमसिंग पराडके यांच्या नेतृत्वात सुरुवात झालेली शोभायात्रा जुने धडगाव मार्गाने विश्रामगृह, हनुमान मंदिर मार्गाने धडगाव पोलीस स्टेशन,रुपसिंग तडवी यांचे निवासस्थान, फॉरेस्ट कार्यालय ,पाटीलबाबा चौक या मार्गाने मेन रोडवरील मुख्य बाजारपेठेततून पुन्हा
विश्रामगृहहाकडे व पोलीस पाटील यांच्या घराकडे परतली. या मिरवणुकीत पारंपरिक वांद्याच्या तालावर आदिवासी बांधवांनी नृत्य केले. भोंग-या बाजारात पारंपरिक पोशाखतील महिला, युवती, युवक, पुरुष आणि ज्येष्ठ सहभागी झाले होते. सकाळी ११.वाजेपासून प्रारंभ झालेल्या या मिरवणुकीचा समारोप दुपारी तीन वाजता पोलीस पाटील भिमसिंग पराडके निवासस्थानी करण्यात आला.

शोभायात्रेत राज्याचे आदिवासी विकास मंत्री अशोक उईके,आमदार राजेश पाडवी, माजी सभापती जामसिंग पराडके, अक्कलकुवा अक्राणी विधानसभा मतदारसंघाचे आमदार आमश्या पाडवी, सभापती गणेश पराडके , माजी जिल्हा परिषद सदस्य रविंद्र पराडके,महेश पराडके माजी जिल्हा परिषद सदस्य विजयसिंग पराडके,मोजू पराडके,बावा् पराडके,फुसा पराडके, मुकेश पराडके

यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी सहभागी झाले होते. सकाळपासून बाजारपेठेत गूळ, दाळ्या,संत्रा,हारकंगण,होळी पूजनासाठी लागणारे साहित्य, खोबरे, शोभेचा कागद आणि कपडे खरेदी साठी शेकडो आदिवासी बांधव दुर्गम भागातून धडगाव येथे आले होते. बाजारपेठेत स्थानिक व्यापा-यांसोबतच शहादा आणि अक्कलकुवा येथूनही फळ व्यापारी सहभागी झाले होते. गेल्या वर्षांच्या तुलनेत यंदा धडगावच्या भोंग-या बाजारात मोठ्या प्रमाणावर उत्साह दिसून आला. यातुन दिवसभरात हजारोंची उलाढाल झाली.

**दागिन्यांची खरेदी वाढली**

होळीच्या पाश्वभूमीवर धडगाव आणि तळोदा सराफ व्यावसायिकांकडे चांदीचे घडीव दागिने बनवून घेण्यासाठी आदिवासी महिला गर्दी करु लागल्या आहेत. सोमवारी धडगावच्या भोंग-या बाजारात चांदीचे दागिने खरेदी -विक्रीतून किमान पाच लाख रुपयांची उलाढाल झाल्याची माहिती देण्यात आले आहे. येथील महिलांकडून तळोदा येथील व्यावसायिकांना दागिन्यांची ऑर्डर देण्यात आल्याची माहिती आहे.


**ढोलाची थापही न्यारी**

दांडी पौर्णिममेनंतर महिन्याच्या कालावधीत येणाऱ्या होळीपर्यंत आदिवासी बांधव होळीव्यतिरिक्त इतर कोणतेही खकार्यक्रम करत नाहीत.यादरम्यान होणारा भोंग-या अर्थात मेला सर्वाधिक पसंतीचा असतो. या मेल्यात ढोल वादनाची स्पर्धा घेतली जाते. धडगाव येतील मानसिंग स्टेडियम (आमराई) येथे सोमवारी भोंग-या दरम्यान ढोल स्पर्धा सुरू होती. यात ३०.च्या जवळपास ढोल वादक सहभागी झाले होते. त्याच्याकढून विविध प्रकारे सजवलेले ढोल बांधलेल्या चालींवर वाजवले जात होते. या वादनाची पाहणी करणारे पाच ते सात तज्ञ ढोल वादकांमध्ये फिरत होते. विजेत्या स्पर्धकाला गावोगावी होणार्या होळीमध्ये ढोल वादनाचा प्रथम मान हे बक्षीस देण्याची परंपरा असल्याने तज्ञ परीक्षक बारकाईने ढोलवर पडणा-या प्रत्येक थापंचे श्रवण करत होते. रंगतदार अशा या स्पर्धेचा उशिरापर्यंत विजेता ठरलेल्या नव्हता. १२.तासांपेक्षा अधिक काळ ढोल वादन सुरु होते.

# होळी आणि धूलिवंदन : रंगांचा उत्सव की सामाजिक आत्मपरीक्षणाची संधी?

फाल्गुन महिन्याच्या पौर्णिमेला साजरा होणारा होळीचा सण हा केवळ रंगांचा उत्सव नाही, तर तो भारतीय संस्कृतीच्या अंत:करणातील आनंद, बंधुभाव आणि परिवर्तनाचा संदेश घेऊन येतो. दुसऱ्या दिवशी साजरे होणारे धूलिवंदन म्हणजे रंगांच्या उधळणीतून नात्यांना नवसंजीवनी देण्याचा दिवस असतो. गावोगावी पेटणाऱ्या होळीच्या ज्वाला आणि सकाळी उधळले जाणारे रंग यामागे एक सखोल तात्त्विक अर्थ दडलेला आहे, ते म्हणजे वाईट प्रवृत्तींचे दहन आणि चांगुलपणाचा स्वीकार. होळीचा उगम पौराणिक कथांशी जोडलेला आहे. दैत्यराज हिरण्यकश्यपू आणि त्याची बहीण होलिका यांची कथा आपण लहानपणापासून ऐकत आलो आहोत. भक्त प्रल्हादाच्या निश्चयी श्रद्धेवर मात करण्यासाठी होलिकेने अग्नीत प्रवेश केला; परंतु सत्य, श्रद्धा आणि भक्तीच्या बळावर प्रल्हाद वाचला आणि होलिका भस्मसात झाली. या कथेतून मिळणारा संदेश आजही तितकाच प्रभावी आहे. अहंकार, अन्याय आणि अत्याचाराचा अंत निश्चित असतो. परंतु प्रश्न असा आहे की, आपण केवळ होळी पेटवतो की खरोखरच आपल्या मनातील 'होलिका' जाळतो? आजच्या समाजात असूया, मत्सर, द्वेष, राजकीय स्वार्थ, धार्मिक ध्रुवीकरण यांसारख्या प्रवृत्ती वाढताना दिसतात. अशा वेळी होळी ही केवळ विधी न राहता आत्मपरीक्षणाची संधी ठरायला हवी.

धूलिवंदन म्हणजे रंगांचा खेळ. सकाळी अंगावर रंग उधळत आपण एकमेकांना बुरा न मानो होली है असे म्हणत हसतखेळत क्षमा मागतो, क्षमा देतो. समाजातील भेद, जात, धर्म, वर्ग, श्रीमंती-गरीबी क्षणभरासाठी का होईना, विरघळतात. रंगांचे वैशिष्ट्य असे की ते प्रत्येकाला सारखेच रंगवतात. पांढरा कुर्ता असो वा महागडी साडी, रंग लागला की सगळे समान! आजच्या काळात ही समता टिकवणे अधिक महत्त्वाचे झाले आहे. सोशल मीडियाच्या आभासी जगात आपण 'लाईक्स' आणि 'फॉलोअर्स'च्या मोजपट्टीवर नाती मोजतो. प्रत्यक्ष भेटीगाठी कमी होत चालल्या आहेत. धूलिवंदन हा सण आपल्याला सांगतो माणसांमध्ये मिसळा, मनमोकळे हसा, जुने राग विसरा. अलीकडच्या काळात होळीच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणावर लाकूड जाळले जाते. रासायनिक रंगांचा वापर वाढतो. त्यामुळे पर्यावरणाचे नुकसान होते, त्वचेच्या तक्रारी वाढतात. सण साजरा करताना पर्यावरणाची काळजी घेणे ही देखील सामाजिक जबाबदारी आहे. शेतीप्रधान देशात फाल्गुन हा हंगाम संपण्याचा आणि नवीन पीक येण्याचा काळ आहे. होळी ही निसर्गाच्या चक्राशी जोडलेली परंपरा आहे. त्यामुळे पर्यावरणपूरक होळी, नैसर्गिक रंगांचा वापर आणि पाण्याची बचत हे आजचे 'नवे संस्कार' ठरायला हवेत.



महाराष्ट्रात धूलिवंदनानंतर रंगपंचमीही मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. नागपूर सारख्या शहरात तर मित्रपरिवार, कुटुंबीय आणि समाजातील विविध घटक एकत्र येऊन हा सण आनंदाने साजरा करतात. परंतु काही ठिकाणी रंगांच्या नावाखाली जबरदस्ती, मद्यपान, महिलांवर गैरवर्तन यासारखे प्रकारही घडतात. हे चित्र चिंताजनक आहे. सणांचा आत्मा हा आनंद आणि सन्मानात असतो; दडपशाहीत नाही. रंग लावला म्हणजे अधिकार मिळाला अशी मानसिकता बदलायला हवी. धूलिवंदन हे 'सन्मानाने रंगवणे' शिकवते, 'जबरदस्तीने रंग चोपडणे' नव्हे. भारतीय समाजजीवनात सणांचे राजकारणाशीही नाते आहे. काही वेळा सणांच्या माध्यमातून समाजात फूट पाडण्याचे प्रयत्न होतात. होळीचा खरा संदेश मात्र एकात्मतेचा आहे. विविधतेत एकता ही भारताची ताकद आहे. होळी आपल्याला सांगते मतभेद असू द्या, पण मनभेद नकोत.आज देशासमोर बेरोजगारी, महागाई, शिक्षण-आरोग्याच्या समस्या, शेतकऱ्यांचे प्रश्न उभे आहेत. होळीच्या ज्वालेसमोर उभे राहून आपण या प्रश्नांवरही विचार करायला हवा. केवळ व्यक्तीगत राग-द्वेष जाळून चालणार नाही; समाजातील अन्याय, विषमता आणि भ्रष्टाचार यांनाही जाळण्याचा निर्धार हवा. इतिहासात होळीच्या उत्सवात स्त्रियांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर राहिला आहे. लोकगीते, फुगड्या, सामूहिक नृत्य यांतून स्त्रियांनी आपला आनंद व्यक्त केला. आजच्या काळात स्त्री-पुरुष समानतेचा संदेशही या सणातून द्यायला हवा. महिलांना सुरक्षित आणि सन्मानाने सण साजरा करता यावा, ही समाजाची जबाबदारी आहे. होळीच्या निमित्ताने बाजारपेठा गजबजतात. रंग, पिचकाऱ्या, मिठाई, पारंपरिक पदार्थ या सर्वांमुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळते. गावरान पुरणपोळी, करंजी, गूळ-पोहे यांचा सुगंध घराघरांत दरवळतो. सण हा अर्थचक्रालाही गती देतो. मात्र, खर्चाच्या स्पर्धेत अडकून मूळ आनंद हरवू नये, याची जाणीव ठेवायला हवी.होळी आणि धूलिवंदन हे नात्यांच्या पुनर्बांधणीचे दिवस आहेत. वर्षभरात गैरसमज होतात, कटुता वाढते. पण या सणाच्या निमित्ताने आपण एकमेकांना भेटतो, मिठी मारतो, रंगपंचमीच्या शुभेच्छा देतो आणि नवे वर्ष नव्या उत्साहाने सुरू करतो. ज्या समाजात संवाद थांबतो, तिथे तणाव वाढतो. होळीचा रंग म्हणजे संवादाची सुरुवात. धूलिवंदन म्हणजे अहंकाराची धूळ झटकून टाकणे. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे अंतर्मनातील होळी. आपल्या मनात साठलेले राग, भीती, न्यूनगंड, असुरक्षितता या सर्वांना जाळणे आवश्यक आहे. होळीची ज्वाला आपल्याला धैर्य देते; धूलिवंदनाचा रंग आपल्याला आनंद देतो. आजच्या वेगवान, तणावपूर्ण जीवनात आपण आनंद साजरा करायलाही विसरलो आहोत. होळी हा सण सांगतो, जगणे म्हणजे केवळ स्पर्धा नव्हे, तर उत्सवही आहे.होळी आणि धूलिवंदन हे केवळ परंपरा नाहीत; ते जीवनदृष्टी आहेत. अन्यायावर न्यायाचा विजय, द्वेषावर प्रेमाचा विजय, निराशेवर आशेचा विजय हा संदेश या सणात दडलेला आहे. यावर्षी होळी पेटवताना आपण केवळ लाकूड जाळू नये; आपल्या मनातील कटुता जाळू या. धूलिवंदन साजरे करताना केवळ रंग उधळू नये; प्रेम, सन्मान आणि समतेचे रंग उधळू या. रंगांच्या या सणात प्रत्येकाच्या आयुष्यात आनंदाची उधळण होवो, समाजात सौहार्द फुलो आणि आपल्या अंत:करणातील होलिका भस्मसात होवो, हीच अपेक्षा. सर्वांना होळी आणि धूलिवंदनाच्या हार्दिक शुभेच्छा!

**-प्रवीण बागडे,नागपूर**
**मो.क्र. ९९२३६२०९१९**

# वाईट विचारांची मूठमाती म्हणजे : होळी

फाल्गुन महिन्यातील पौर्णिमेला होळी हा सण भारतभर अतिशय उत्साहाच्या वातावरणात सर्वत्र साजरा केला जातो. आज होळीच्या निमित्ताने वाईट विचारांची,कुप्रथांची होळी करण्याची पद्धत फार पूर्वी पासून चालत आलेली आहे.

भक्त प्रल्हाद व होलिका यांच्या अनेक पौराणिक कथा आपल्याला सांगता येतात. होलीकाचा दुष्ट हेतू जगासमोर आला आणि तिला स्वतः जळून भस्म व्हावे लागले. त्यामुळे कधीही कोणाबद्दल वाईट विचार चिंतू नयेत. कोणाचं वाईट होऊ नये अशी अपेक्षा सुद्धा करू नये त्यासाठीच आज वाईट विचारावर चांगल्या विचाराची पेरणी व्हावी, वाईट विचाराची समाप्ती व्हावी, वाईट विचार आपल्यातून निघून जावेत, या सर्व हेतूने होळी पेटविली जाते. या होळीला पुरणाची पोळी नैवेद्य दाखवून गोव-या ,बिगर कामाची लाकडे,एकत्रित करून होळी पेटवली जाते.

महिला भक्तिभावाने होलीला पुजतात.खोबऱ्याचे तुकडे त्या होळीच्या विस्तवावर भाजून खातात. भारताच्या वेगवेगळ्या राज्यात वेगवेगळ्या नावाने होळीला ओळखले जाते.समाजामध्ये होळी हा सण अतिशय उत्साहाने पंधरा दिवस साजरा केला जातो. होळी लावण्याची प्रथा गावानुसार वेगवेगळ्या जाती-जमातीच्या लोकांना दिली गेली आहे. त्यामुळे सामाजिक बांधिलकी जोपासून होळी सहन साजरा केला जातो.

आपण नेहमी चांगले कर्म करावेत. कुनीतीने वागू नये. चांगल्या पद्धतीने सर्वांना सोबत घेऊन वागावे. आचार विचाराने चालावे,प्रत्येकाला समानता द्यावी. आज सर्वत्र विषमता निर्माण झाली आहे ,ही गोष्ट समाजोपयोगी नाही, वाईट विचार जाण्याचा हा दिवस म्हणजेच होळी होय.

होळीच्या निमित्ताने समाजामध्ये जातीय सलोखा निर्माण व्हावा. बंधूभाव दिसून यावा. वैरभाव राहू नये. यासाठी सर्वांनी एकत्रित येऊन जातीविरहित, प्रांतविरहित, वंश विरहित होळी साजरी व्हावी. मराठवाड्यामध्ये होळीलाच( शिमगा) असे म्हणतात. आमच्या गावाकडची होळी फार वेगळ्या पद्धतीने साजरी केली जात असे. मंदिराच्या समोर मोठमोठी लाकडी आणून बोंबा मारून घरासमोर जाऊन होळी साजरी केली जाते. पूर्वीची होळी आणि आत्ताची होळी यामध्ये फार फरक झाला आहे. खेळताना रंग बाई होळीचा, फाटला ग कोना माझ्या चोळीचा ...या गाण्याने अक्षरशः मागील काही वर्षाखाली या गीताने वेड लावले होते. खरोखरच होळी नातेसंबंधांना मजबूत करून ठेवते. होळी मधून वाईट विचार जाळले जातात. मोबाईल युगामध्ये माणूस फक्त होळीच्या शुभेच्छा मोबाईल वरून देऊन मोकळा होत आहे. सध्याची परिस्थिती अतिशय वेगळी झाली आहे. होळीच्या निमित्ताने खांबाला नाही गोळा ठकूला नाही डोळा. असे नाव न घेता पुढील माणसाला उद्देशून होळीची मजा लुटली जात असे. नैसर्गिक



चक्र बदलून थंडी गायब होऊन उन्हाची दाहकता वाढू लागली आहे. दुसऱ्या दिवशी धुळवड खेळली जाते.आम्ही लहानपणी रंगपंचमी खेळताना आमच्याकडे रंग म्हणजे काळा रंग असे. तोंडाला तो लावायचा आणि घरोघरी हिंडायचं? कपडे फाटलेले घालायचे,आपल्याला नातं पडणाऱ्या व्यक्तीलाच रंग लावायचा. गाणे लावायचे. आज होली है ।। हे अमिताभ बच्चनचं गाणं त्या काळात फार लोकप्रिय होत,

रंग बरसे... या गाण्यावर तरुणाई थिरकत होती. एकमेकांमध्ये आपुलकी जिव्हाळा होता. मनामध्ये वाईट हेतू धरून कोणीही एकमेकाला रंग लावत नसे.आज परिस्थिती बदलली. माणसाची आतून बाहेरून रंग बदलले आहेत. अनेक व्यक्ती खोटे बोलत आहेत. कोणता रंग कधी दाखवीतील, याचा विश्वास राहिला नाही. पळसाचे फुले यांच्यापासून निघणारा लाल भडक रंग खेळला जात असे. गाई बैलांची शेण एकत्रित करून त्यात पाणी टाकून ते सुद्धा आम्ही एकमेकांच्या अंगावर फेकत असत, तरीही मानवामध्ये एकमेकांबद्दल गोडवा होता. कोणाबद्दल कोणाचेच हेवेदावे नव्हती. कारण लोकांचे रंग खेळताना वयाचे भान राहत नसत. कोणताही व्यक्ती रंगपंचमी खेळत असे. महाराष्ट्रामध्ये होळी आणि धुलवड फार मोठ्या प्रमाणात सर्वत्र साजरा करून आनंद घेतला जातो. हे परंपरा पुढे चालू ठेवण्यासाठी तरुणांनी आपल्या सण उत्सवाची माहिती करून घ्यावी. त्यातून वैज्ञानिकता सुद्धा जोपासवी.थंडी संपवून उन्हाळ्या सुरू होतो. त्यामुळे सर्वांनी काळजी घ्यावी. पर्यावरणाचा समतोल राखावा, कोणत्याही प्रकारची वृक्षतोड करून होळीमध्ये जाळून टाकू नये. ऑक्सीजन साठी वृक्षाची फार गरज आहे. हे सुद्धा प्रत्येकाने लक्षात घ्यावे. यापुढे आपण काही वाईट विचार मनात येऊन देणार नाही, झाडे तोडणार नाही. याची सर्वांसोबत शपथ घ्यावी. विद्यार्थ्यांनी मी कॉपी करणार नाही. मोठ्या व्यक्तींनी मी व्यसनी व्याभिचारी होणार नाही.अपहरण चोरी करणार नाही,

होळीच्या पवित्र अग्नीमध्ये निराशा, दारिद्र्य,आळस, यांचे दहन होवो. आणि सर्वांच्या आयुष्यात आनंद समृद्धी, आरोग्य या जगी नांदो..

शिव शंकराने होळीच्या दिवशीच आपल्या तिसऱ्या नेत्रातून वाईट विचारांना,प्रथांना वासनेला, विकारांना जाळून टाकले.

अशा या होळीच्या व रंगपंचमीच्या सर्वांना खूप खूप शुभेच्छा...

**प्रा.बरसमवाड विठ्ठल गणपत**
**अध्यक्ष विठू माऊली प्रतिष्ठान खैरकावाडी**
**या.मुखेड जि.नांदेड**

# कुंडलवाडीत एस टी महामंडळला वेळापत्रकाची आवश्यकता नाही काय?

दैनिक वादळ वार्ता
**कुंडलवाडी । प्रतिनिधी**

कुंडलवाडीतील एस टी महामंडळाचे सुविधा असून नसल्याने दिसून येत आहे व काही ठिकाणी एसटी महामंडळाचे बसेस थांबण्याचे ठिकाण आहे त्या ठिकाणी एसटी महामंडळाचे बसेस थांबू शकत नाहीत का?व प्रवाशांची काहीही वाकडेपणाने बोलत आहेत एसटी महामंडळाचे कर्मचारी काही पैसे साठी ही चिल्लर नसतानाही एसटीतून उतरून जा असे म्हणत आहेत. कुंडलवाडी एस टी महामंडळाच्या वेळापत्रक ची आवश्यकता आहे ,वेळापत्रक मध्ये असून नसल्याने होऊन गेली व त्या ठिकाणी कर्मचारी असतानाही त्यांना विचारलं एसटी कवा येत आहे म्हणून



त्यांनी म्हणालेत विचारपूस केल्यास अभी तक वो नही आई कब आता पता नही है , अधिकाऱ्यांच्या भाषा असे वापरल्या जात आहेत. आणि कुंडलवाडी ते बिलोली जाण्यासाठी एसटी महामंडळाचे बस सेवा चालू केलेली आहे मात्र ते बसेस कुठे थांबायचं तिथे थांबत नाहीत व समोर दोन किलोमीटरच्या अंतरावर तिथं थांबत आहेत. कुंडलवाडीतील चिंगी नाका येथे बस सेवा थांबत नाही अनेक दिवसापासून लोकांची फार समस्या आहे धर्माबाद बिलोली या मार्गावर चुंगीनाका या ठिकाणी एसटी महामंडळाचे बस सेवा थांबत नाहीत व थांबल तर बी काही पैसे किंवा चिल्लर चिल्लर नाहीत म्हणून हाकलून टाकू लागतात व चुंगीनाका येथून परवाना बरेच वाहक नाकारत आहेत

# शासकीय विश्रामगृह नरसी येथे व्हॉइस ऑफ मीडिया बिलोली तालुका कार्यकारणी जाहीर

दैनिक वादळ वार्ता
**बिलोली । प्रतिनिधी**

व्हॉइस ऑफ मीडिया बिलोली तालुका
आध्यक्ष पदी आनंदराव नारायण सूर्यवंशी तर उपाध्यक्ष राजू बाभळीकर, उपाध्यक्ष गंगाधर संभाजी शिंदे, सचिव पदी नबाजी कुडकेकर, सहसचिव बाबुराव पाटील भुते , कोषाध्यक्ष गौतम सोनकांबळे, सह कोषाध्यक्ष सोपान गारे, वैभव घाटे, तालुका संपर्कप्रमुख राजाराम
गुरगुलवाड, सदस्य श्रीकांत ढाले, व्यंकट जेटाळकर, शंकर पवार व्हॉइस ऑफ मीडिया नायगाव तालुका आध्यक्ष गंगाधर ढवळे व प्राध्यापक बाळासाहेब शर्मा



यांच्या हस्ते सर्व पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. बिलोली तालुका व्हॉइस ऑफ मीडियाची कार्यकारणी जाहीर करण्यात आली.

# मराठी भाषा ही एकतेचे प्रतीक असून मातृभाषेचा गौरव आहे-प्रा. संदिप ढेंगरे यांचे प्रतिपादन

दैनिक वादळ वार्ता
**वैरागड । प्रतिनिधी**

मराठी भाषा गौरव दिन हा दरवर्षी २७ फेब्रुवारी रोजी महाराष्ट्राचे ज्येष्ठ कवी विष्णू वामन शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या जन्मदिवशी साजरा करण्यात येते. कुसुमाग्रज यांनी महाराष्ट्रच्या सांस्कृतिक क्षेत्रामध्ये मोलाचे योगदान दिले असून मराठी भाषा ही ज्ञानभाषा होण्यासाठी अथक परिश्रम घेतले गेले. मातृभाषेचा गौरव म्हणून कुसुमाग्रज यांच्या स्मृतींना अभिवादन म्हणून त्यांचा जन्मदिवस 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरा करण्याचा शासन निर्णय दिनांक २१ जानेवारी २०१३ रोजी घेण्यात आला. मराठीचा सन्मान वाढविण्यात त्यांनी महत्वपूर्ण योगदान दिले. ज्यात 'विवेकसिंधू'



हे मराठी भाषेतील पहिले ग्रंथ लिहिणारे आद्यकवी मुकुंदराज यांचे मोलाचे योगदान आहे. मराठी भाषेला सर्वप्रथम सन १९६५ मध्ये राजभाषेचा दर्जा देऊन तिच्या समृद्धीसाठी विशेष उपाययोजना करणारे महानायक वसंतराव नाईक यांच्याही ऐतिहासिक योगदानाचे या निमित्ताने स्मरण केले जाते. म्हणून मराठी भाषा ही एकतेचे प्रतीक असून मातृभाषेचा गौरव आहे. असे प्रतिपादन प्रा. संदिप ढेंगरे यांनी प्रतिपादन केले.

आरमोरी तालुक्यातील विहीरगाव येथील यशवंत कला कनिष्ठ महाविद्यालय तथा जगदंबा विद्यालय येथे दि. २७ फेब्रुवारी रोजी 'मराठी भाषा गौरव दिन' साजरा करण्यात आला. याप्रसंगी अध्यक्ष स्थानावरून प्रा. संदिप ढेंगरे मार्गदर्शन करीत होते.

यावेळी प्रा. पिल्लारे, शिक्षक बोरकर, वाळके, शिक्षिका अर्जुनकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन भुमिका सेलोटे तर आभार अर्पिता वाघाडे यांनी मानले. यावेळी गावातील नागरिक आणि विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

# जगदंबा उच्च माध्यमिक विद्यालयात नवे केंद्रसंचालक;प्रा.प्रवीण बिरादार यांची नियुक्ती

दैनिक वादळ वार्ता
**माहूर । प्रतिनिधी**

, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ अंतर्गत लातूर विभागीय मंडळ यांच्या वतीने सुरू असलेल्या परीक्षांसाठी माहूर येथील केंद्रात नव्या केंद्रसंचालकांची नियुक्ती जाहीर करण्यात आली आहे. सावित्रीबाई फुले विद्यालय, अंजखेडचे प्रा. प्रवीण रंगराव बिरादार यांची केंद्रसंचालक म्हणून नियुक्ती करण्यात आल्याचे विभागीय मंडळाकडून स्पष्ट करण्यात आले.

नायब तहसिलदारांच्या पाहणीनंतर गैरप्रकार उघडकीस आल्यानंतर तत्काळ प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे. परीक्षा प्रक्रियेची पारदर्शकता व शिस्त अबाधित राहावी, या उद्देशाने ही नियुक्ती करण्यात आली असून



यासंदर्भातील आदेश दि. २६ फेब्रुवारी रोजी विभागीय सचिव, लातूर विभागीय मंडळ यांनी निर्गमित केल्याची माहिती अधिकृत पत्रातून देण्यात आली आहे.

# मागील पाच वर्षातील सर्व ठेक्यांची चौकशी व्हावी !

## बहुजन विकास आघाडीची मागणी

दैनिक वादळ वार्ता
**परभणी । प्रतिनिधी**

मागील पाच वर्षाच्या प्रशासकीय आणि निवडणूक आचारसंहिता काळात परभणी महापालिका क्षेत्रात केली गेलेली विकास कामे, त्या प्रकरणी काढण्यात आलेली टेंडर्स आणि संबंधित ठेकेदारीविषयीची इत्यंभूत माहिती जाहीर करुन त्या सर्व प्रकरणांची सखोल चौकशी केली जावी, अशी मागणी बहुजन विकास आघाडीतर्फे करण्यात आली आहे.

घनकचरा विभागाचा पंचवार्षिक ठेका, ज्या श्रेणीच्या अधिकाऱ्यांकडून कोणत्या भाषेत प्रसिद्ध केला गेला, त्याची सर्व विगतवारी, इंग्रजी भाषेत टेंडर काढून मराठी मायबोली भाषेवर आघात व उल्लंघन केले असेल आणि जनतेची दिशाभूल करण्याचा जो प्रयत्न झाला असेल त्यांची नेमकी कारणं मिमांसा, छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारका सभोवताली जे



सुरक्षा कठडे व लोखंडी ग्रील बसविण्यात आले आहे, त्याची एकूण रक्कम, कामाचा दर्जा, श्रेणी, योगेतेचा कालावधी व इतर महत्वपूर्ण माहिती, सिमेंट कॉंक्रिट व डांबरीकरणाचे रस्ते आणि गटारांच्या कामांचा दर्जा, योग्यतेचा कालावधी आणि टेंटर्सची रक्कम किती, शहरात न केलेली साफसफाई परंतु त्या हेडखाली उचललेली रक्कम किती व कोणी स्वीकारली, या व अशा अनेक संशयास्पद अशा नागरी विकास कामांची कसून चौकशी करुन वास्तव जनतेसमोर येणे आवश्यक आहे, असेही बहुजन विकास आघाडीचे म्हणणे आहे. कारण त्यात करदात्या नागरिकांचा पैसा असून जनतेसाठी दर्जेदार कामे होणे आवश्यक असून त्यातील पारदर्शकता सिध्द व्हावी, असेही जनतेला वाटणे स्वाभाविक आहे. नव्हे, तो जनता जनार्दनाचा घटनादत्त असा अधिकारच आहे.

**मराठीचे उल्लंघन घातक**

संपूर्ण राज्यात मराठी भाषेचा गौरव दिन मोठ्या जल्लोषात साजरा केला जात असतांना परभणी शहर महानगरपालिकेत मात्र मोठ्या प्रमाणात गळचेपी केली जात असल्याचे वास्तव समोर आले आहे. तद्वतच ते अत्यंत घातक ठरणारे असल्याचा घणाघात बविआचे परभणी जिल्हाध्यक्ष दत्तात्रय कराळे यांनी केला आहे.

दरम्यान, नवनिर्वाचित महापौर सय्यद इक्बाल ख्वाजा हे अल्पसंख्याक असूनही ते उर्दू किंवा हिंदी या भाषेंऐवजी मायबोली मराठीचा पूर्णपणे वापर करुन एक आगळावेगळा आदर्श जनतेसमोर ठेवतात. हे वास्तव असले तरी काही अधिकारी मात्र जनतेची दिशाभूल करण्यासाठी तद्वतच आपली छाप पाडण्यासाठी म्हणून जाणीवपूर्वक इंग्रजी भाषेचा वापर करतात. राज्यात शासकीय व निमशासकीय कार्यालयातून मराठी भाषा हीच सक्तीने वापरली जावी, असा शासनाचा दंडक असतांनाच अशा प्रकारचं कृत्य करणे म्हणजे विघातक नीती व शक्तीचा वापर करणे होय. तेव्हा अशा प्रकारची गळचेपी मराठी भाषेविषयी होता कामा नये. हे किमान परभणीत तरी समजून घेतलं पाहिजे. त्यांच्यावरही कठोर कारवाईचा बडगा उगारला जाणे आवश्यक ठरणार असल्याचं बविआचं म्हणणं आहे.

# केक नव्हे, तर 'फळे' कापून दिला आरोग्याचा संदेश! अंगणवाडी शिक्षिका शालिनीताई घरटे यांचा अनोख्या उत्साहात वाढदिवस साजरा

## पाश्चात्य संस्कृतीला फाटा देत समाजासमोर ठेवला नवा आदर्श; मान्यवरांच्या उपस्थितीत शुभेच्छांचा वर्षाव

दैनिक वादळ वार्ता

**नगर । तुषार महाजन**

सध्याच्या काळात वाढदिवस म्हटले की पाश्चात्य संस्कृतीचे अंधानुकरण करत महागडे केक कापणे आणि वायफळ खर्च करणे, हे जणू एक समीकरणच बनले आहे. मात्र, या परंपरेला फाटा देत, नव्या पिढीवर सुसंस्कार घडवणाऱ्या अंगणवाडी शाळेच्या कर्तव्यदक्ष शिक्षिका शालिनीताई घरटे यांनी आपला वाढदिवस अत्यंत अनोख्या आणि आरोग्यदायी पद्धतीने साजरा केला. केक कापण्याऐवजी 'विविध प्रकारची ताजी फळे कापून' त्यांनी आपला वाढदिवस मोठ्या उत्साहात आणि आनंदमयी वातावरणात साजरा करत समाजासमोर एक नवा आणि स्तुत्य आदर्श निर्माण केला आहे.

अंगणवाडीच्या चिमुकल्यांना नेहमी आरोग्याचे धडे देणाऱ्या शालिनीताईंनी स्वतःच्या वाढदिवसाला फळे कापून जो उपक्रम राबवला, त्याचे सर्व स्तरांतून भरभरून कौतुक होत आहे. या आगळ्यावेगळ्या आणि आनंददायी सोहळ्याला परिसरातील अनेक प्रतिष्ठित मान्यवरांनी आवर्जून उपस्थिती लावत शालिनीताईंवर शुभेच्छांचा वर्षाव केला.या उत्साहपूर्ण सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून भाजपा पिंपळनेर मंडळाचे उपाध्यक्ष श्री. दिलीप घरटे, परिसराचे माजी उपसरपंच श्री. देविदास रायते, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सेवानिवृत्त इंजिनिअर श्री. डी. के. इंगळे, तसेच 'राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघा'चे महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष व ज्येष्ठ पत्रकार श्री. संजय महाजन आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी या नाविन्यपूर्ण संकल्पनेचे तोंडभरून कौतुक केले.

**हा तर खऱ्या अर्थाने 'सुसंस्कारांचा' वाढदिवस! – पत्रकार संजय महाजन**



या अनोख्या सोहळ्याला उपस्थित राहिल्यानंतर आपली विशेष प्रतिक्रिया व्यक्त करताना राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाचे राज्य उपाध्यक्ष श्री. संजय महाजन म्हणाले, अंगणवाडी शिक्षिका या खऱ्या अर्थाने समाजाचा आणि नव्या पिढीचा भक्कम पाया घडवण्याचे पवित्र काम करत असतात. शालिनीताईंनी आज केक न कापता फळे कापून वाढदिवस साजरा करण्याची जी संकल्पना राबवली, तो केवळ एक सोहळा नसून समाजाला दिलेला एक अतिशय सुंदर आणि आरोग्यदायी संदेश आहे. जो विचार आपण मुलांना देतो, तोच विचार त्यांनी आपल्या कृतीतून मांडला आहे. हा वाढदिवस खऱ्या अर्थाने 'सुसंस्कारांचा' आणि 'आरोग्याचा' उत्सव ठरला आहे. त्यांच्या या स्तुत्य उपक्रमाचे जितके कौतुक करावे तितके थोडेच आहे!हा संपूर्ण सोहळा अतिशय खेळीमेळीच्या आणि आनंदाच्या वातावरणात पार पडला. कापलेली फळे उपस्थित सर्वांना आणि लहानग्यांना वाटून आरोग्याचा गोडवा वाटण्यात आला. शालिनीताईंना निरोगी आणि दीर्घायुष्याच्या शुभेच्छा देत या सुंदर कार्यक्रमाची सांगता झाली.

# महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेच्या बीड मंडळ व विभागीय कार्यकारिणीची घोषणा; नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे जंगी स्वागत!

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**



महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेच्या संघटन बांधणीला अधिक बळकटी देण्यासाठी बीड विभाग आणि बीड मंडळ कार्यकारिणीच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. लातूर परिमंडळाचे अध्यक्ष आर.एस. गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली आणि प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीत हा निवडीचा कार्यक्रम उत्साहात पार पडला.यावेळी केंद्रीय उपसरचिटणीस श्री.एन. डी.पोटभरे आणि लातूर परिमंडळ कोषाध्यक्ष श्री.विष्णु तेलंग साहेब यांची प्रमुख उपस्थिती होती.संघटनेच्या ध्येय धोरणांना तळागाळातील कर्मचाऱ्यांपर्यंत पोहोंचवण्यासाठी कार्यक्षम आणि अभ्यासू कार्यकर्त्यांची फळी या कार्यकारिणीच्या माध्यमा तून उभी करण्यात आली आहे.नवनियुक्त बीड मंडळ कार्यकारिणी खालीलप्रमाणे आहे.

अध्यक्ष-अविनाश सोनकांबळे,कार्याध्यक्ष प्रदिप वाघमोडे,सचिव शेख मुज्जमील, कोषाध्यक्ष हनुमंत कांबळे,उपाध्यक्ष १)रमाकांत डिकले २) विशाल रामेश्वर गायकवाड ३) त्रिबंक रोडे ४) सय्यद रशीद ५) बादशह खान,सहसचिव १) विक्की वाघमारे २) अतुल सिताप,मुख्य संघटक १) नागेश हळगावकर २) सतेज सोनवणे,प्रसिद्धी प्रमुख महेश भोडंवे संघटनेचा विचार व कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी ही नवनियुक्त टीम कटिबद्ध राहील,असा विश्वास वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी यावेळी व्यक्त केला.

निवड झालेल्या सर्व पदाधिकाऱ्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत असून,त्यांच्या पुढील संघटनात्मक वाटचालीस आणि सामाजिक कार्या साठी मंगलकामना व्यक्त करण्यात येत आहेत. शिवाजी घुले केज महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटना,लातूर परिमंडळ यांनीनवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे स्वागत केले आहे व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# कु.स्वप्नाली देशमुख यांचे एमपीएससी परीक्षेत यश

## कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत कनिष्ठ अभियंता पदावर निवड

दैनिक वादळ वार्ता

**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील कु.स्वप्नाली सुधीर देशमुख (मोगरेकर) यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी) परीक्षेत यश संपादन करत कल्याण - डोंबिवली महानगरपालिकेत कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) पदावर निवड मिळवून उल्लेखनीय यश प्राप्त केले आहे. त्यांच्या या यशामुळे परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून सर्व स्तरांतून कौतुक व्यक्त करण्यात येत आहे.कु.स्वप्नाली देशमुख यांनी आपले माध्यमिक शिक्षण श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालय येथे पूर्ण केले. त्यानंतर त्यांनी गव्हर्नमेंट पॉलिटेक्निक, बीड येथून सिव्हिल इंजिनिअरिंग डिप्लोमा शिक्षण पूर्ण केले. डिप्लोमा शिक्षणादरम्यान त्यांनी ८५ टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवत आपल्या शैक्षणिक गुणवत्तेची छाप पाडली.त्यांच्या उत्कृष्ट गुणवत्तेची दखल घेत श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या हुशार व होतकरू विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या शैक्षणिक सवलत योजनेअंतर्गत



अभियांत्रिकी शिक्षणासाठी त्यांना शैक्षणिक शुल्कामध्ये १०० टक्के सवलत मिळाली. पुढे त्यांनी श्री तुळजाभवानी इंजिनिअरिंग कॉलेज, तुळजापूर येथून अभियांत्रिकी शिक्षण पूर्ण केले. सरळसेवा भरती प्रक्रियेद्वारे घेतलेल्या परीक्षेत उत्कृष्ट यश मिळवत त्यांची कल्याण - डोंबिवली महानगरपालिकेत कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) पदावर निवड झाली आहे. कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण अभ्यास आणि जिद्दीच्या जोरावर त्यांनी हे यश संपादन केले असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी त्या प्रेरणादायी ठरत आहेत.अत्यंत साध्या व गरीब परिस्थितीतून त्यांनी हे यश मिळवले आहे. त्यांचे वडील श्री.सुधीर देशमुख हे फ्रेम मेकर असून फोटो बनविण्याचा व्यवसाय करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात, तर आई सौ.शुभांगी देशमुख या कुमार ड्रेसेस या कापड दुकानात नोकरी करतात. कुटुंबाच्या मर्यादित आर्थिक परिस्थितीतही आई-वडिलांनी प्रामाणिकपणा, कष्ट आणि शिक्षणाची जिद्द यांची दिलेली शिकवण स्वप्नाली यांच्या यशामागे महत्त्वाची ठरली. त्यांचा भाऊ देखील पुणे येथे अभियांत्रिकी शिक्षण घेत असून संपूर्ण कुटुंब शिक्षणाच्या बळावर प्रगतीचा मार्ग निवडत आहे.आई-वडिलांच्या अथक परिश्रमांचा, संघर्षाचा आणि प्रामाणिक जीवनमूल्यांचा सन्मान करत कु.स्वप्नाली देशमुख यांनी आपल्या यशाचे श्रेय आई-वडिलांना दिले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात येत असून त्यांच्या पुढील उज्ज्वल कारकिर्दीसाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

# रयत सामाजिक प्रतिष्ठानचा १६वा पुरस्कार वितरण सोहळा २०२६ थाटात सपन्न

## सामाजिक, सांस्कृतिक व कला क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

सामाजिक, सांस्कृतिक व कला क्षेत्रातील व्यक्तींना प्रेरणा देऊन त्यांचा उत्साह वाढविण्याच्या उद्देशाने रयत सामाजिक प्रतिष्ठानचा सोळावा पुरस्कार वितरण सोहळा २०२६ येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात भव्य आणि दिमाखदार वातावरणात संपन्न झाला.

हा सोहळा प्रतिष्ठानच्या रोहिणीताई गणेश माने यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन प्रतिष्ठानच्या अध्यक्षा सुलोचना माने व शुभांगी माने यांनी केले होते. कार्यक्रमाची विशेष आकर्षण ठरली ती प्रमुख उपस्थिती राजेश दादा खर्डे (वेसावकर) यांची पारंपरिक कोळी वेशातील दमदार एन्ट्री. तसेच प्रतिष्ठान अध्यक्षा द्रौपताबाई पठारे, ज्येष्ठ समाजसेवक कैलास दादा पठारे, विठ्ठल मूर्तीवार, मंजू ताई पठारे, अक्षय



कलाकार, बंडोपंत सोळुंके, चित्रपट मंडळाचे प्रशांत होर्शीळ सर, समाजसेवक सुशीलजी खटोड, एम.एस. कन्स्ट्रक्शनचे संचालक साथीराम अण्णा ढोले, ओबीसी फाउंडेशनचे लक्ष्मण लटपटे, अहिल्यानगर येथील संतोष अवताडे, तसेच सोशल मीडियावर लोकप्रिय असलेले इंस्टाग्राम रील स्टार लखन चव्हाण, ओम पावले, खंडू तात्या आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली. यावेळी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. सन्मानितांमध्ये प्रमोद रामदासी, लक्ष्मीकांत रुईकर, आदिम राज बहुउद्देशीय संस्था (रामू मोते), सुशील हरिभाऊ कोळेकर, पसायदान सेवा केंद्रचे गोवर्धन दराडे, सरोज आनंदकर (नागपूर), संगीता माने (क्राईम ब्रँच, मुंबई), प्रमोद गोरक्षनाथ चांदणे, प्राची चांदणी, देविदास उत्तम शेलार, नयना रतन कानडे यांचा समावेश होता. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन गणेश तालखेडकर यांनी प्रभावीपणे केले. प्रतिष्ठानचे सदस्य गणेश माने, किशोर कुलकर्णी, प्रकाश देवा, जाकीर भाई, विकास धोत्रे, गुड्ड्या जोगदंड, महादेव सवाई, मीनाक्षी देवकते, नयना भाकरे, नेहा साबळे व इतर सदस्यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले. भव्य-दिव्य स्वरूपात पार पडलेल्या या सोहळ्याच्या शेवटी उपस्थित सर्व मान्यवरांचे आभार मानत कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. रयत सामाजिक प्रतिष्ठानच्या या उपक्रमामुळे सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तींना नवी ऊर्जा आणि प्रेरणा मिळाली आहे.

# आमदार तथा माजी राज्यमंत्री डॉ.धर्मराव बाबा आत्राम यांच्याकडुन आर्थिक मदत



दैनिक वादळ वार्ता

**सिरोंचा । प्रतिनिधी**

झिंगानूर येथील राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे कट्टर समर्थक,माजी पंचायत समिती सभापती दासू मडावी हे लकवाग्रस्त झाले.ही माहिती अहेरी विधानसभा क्षेत्राचे लोकप्रिय आमदार तथा माजी राज्यमंत्री डॉ. धर्मराव बाबा आत्राम यांना कळवतच वेळेचा विलंब न करता, लकवाग्रस्त दासू मडावी यांना पुढील उपचारासाठी आर्थिक मदत पाठविले.राष्ट्रवादी कॉंग्रेस अहेरी विधानसभा अध्यक्ष लक्ष्मण येर्रावार व राष्ट्रवादी कॉंग्रेस सिरोंचा तालुका अध्यक्ष मधुकर कोल्लूरी यांनी झिंगानूर गाठून दासू मडावीच्या भेट घेऊन आरोग्य विषयी विचारपूस करून आमदार धर्मरावबाबा आत्राम यांनी पाठवलेली आर्थिक मदत मडावी यांनी दिली.यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस अहेरी विधानसभा अध्यक्ष लक्ष्मण येर्रावार, राष्ट्रवादी सिरोंचा तालुका अध्यक्ष मधुकर कोल्लूरी,माजी सरपंच बोडका गावडे, कैलास आत्राम, महेश दुर्गमसह झिंगानूर परिसरातील राष्ट्रवादी कॉंग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# रिसोर्टसाठी शेतजमिनीतून जबरदस्तीने मार्ग; पिकांचे नुकसान, शेतकऱ्यांचा आक्रोश

दैनिक वादळ वार्ता

**चिमूर । प्रतिनिधी**

बामणी शेतशिवारात रिसोर्ट प्रकल्पासाठी उभ्या पिकातून १५ फूट रुंदीचा रस्ता काढण्यात आल्याने स्थानिक शेतकऱ्यांत संताप व्यक्त होत आहे. विधवा महिला शेतकरी नमिता येळणे यांनी प्रशासनाकडे न्यायाची मागणी केली असून कापूस पिकासह २२ सागवान झाडांचे नुकसान झाल्याचा आरोप केला आहे.माहितीनुसार, सर्वे क्र. २३७ मधील १.१८ हेक्टर आर जमीन प्रविण सपाटे यांनी रिसोर्ट उभारणीसाठी खरेदी केली. संबंधित विक्रीपत्रात आधीपासून वहिवाट रस्ता नमूद असतानाही नवीन मार्गाची मागणी करण्यात आली. त्यासाठी चंदन येळणे व किसन दुधनकर यांच्या शेतातून रस्ता देण्याचा प्रस्ताव तहसील कार्यालयात सादर करण्यात आला. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम १४३ अंतर्गत अर्जावर सुनावणी झाली. यावेळी येळणे व दुधनकर यांनी लेखी आक्षेप घेत, जुन्या रस्त्याचा वापर करावा किंवा वन विभागाच्या जागेतून पर्यायी मार्ग शोधावा, अशी भूमिका मांडली. तसेच शेतातून रस्ता देण्यास विरोध दर्शवित कायदेशीर कारवाईची मागणी केली.

तरीदेखील २३ जून २०२५ रोजी तहसीलदारांनी संबंधित शेतधुऱ्यावरून १५ फूट रस्ता मंजूर केला. या आदेशाविरोधात अपील न केल्याने पुढील कारवाई थांबविता आली नाही, असे येळणे कुटुंबीयांचे म्हणणे आहे. २५ फेब्रुवारी २०२६ रोजी पोलिस व महसूल अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत रस्त्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली. उभ्या कापूस पिकातून मार्ग काढताना मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. शेत भाड्याने करणाऱ्या व्यक्तीस भरपाई देण्यात आल्याचे सांगितले जात असले तरी मूळ जमीनमालकांना कोणतीही नुकसानभरपाई मिळाली नसल्याचे नमिता येळणे यांनी स्पष्ट केले.ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प परिसरात पर्यटनवाढीमुळे रिसोर्ट उभारणीचे प्रमाण वाढले आहे. मात्र, यासाठी शेतकऱ्यांच्या हक्कांवर गदा येऊ नये, अशी मागणी स्थानिकांकडून होत आहे. आमच्या मालकीच्या शेतातील उभे पीक आणि सागवान झाडे उद्ध्वस्त झाली.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077